# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ३८०/२०२३ दिनांक – ३०/१०/२०२३

## फसवणुकीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगारास आचोळे पोलीसांनी केली अटक

आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४९९/२०२३ भादवि कलम ४२०,४६५, ४६७,४६८,४७१ प्रमाणे गुन्हयाचे तपासी अधिकारी पोउपनि/रेखा पाटील यांना सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत अजित दयाशंकर मिश्रा रा. अंजठा बिल्डीग बी विंग रुम नं ३०४, डॉन बास्को स्कुल जवळ,नायगांव पुर्व व चालक अजय अंकुश गायकर वय ३९ वर्षे रा. साई सावळी चाळ रुम नं ०५,गणेशनगर नायगाव पुर्व हा नायगाव पुर्व डॉन बास्को स्कुल जवळ, अंजठा बिल्डीग मध्ये राहत असल्याची गुप्त बातमीदार यांचेकडुन माहीती मिळाल्याने सदरची माहीती आम्ही वपोनि/पवार यांना कळविल्याने आमचे आदेशान्वये सदर आरोपी याचा शोध घेणेकामी पोउपनि/रेखा पाटील सोबत पोकॉ/ शिवराम शिंदे मसबु कर्मचारी/आव्हाड, मसुब/खवले हे रवाना झाले.

आरोपीत यास पोलीसांची चाहुल लागल्याने स्वतःची अटक चुकविण्यासाठी आरोपीत अजित दयाशंकर मिश्रा हा त्यांचे इनोव्हा क्रिस्टा एम.एच.४८ सी.सी १३५२ गाडीमधुन पळुन जाण्याचे तयारीत असतांना पोलीस पथकास दिसल्याने पोलीसांनी आरोपीताची गाडी थांबवुन आरोपीत यांचेशी बोलत असतांना तपासी अधिकारी यांना आरोपीत याने जिवे मारण्याची दमदाटी करुन पुन्हा गाडीमधुन पळुन जात असतांना पोलीस पथकामील अंमलदार यांना गाडीने जिवे मारण्याचा प्रयत्न केला असता प्रसंगावधान दाखवुन पथकातील अंमलदार बाजुला होवून सोसायटीचे गेट बंद केल्याने आरोपीताची गाडी बंद पडल्याने अंथग परिश्रमाने सराईत आरोपीतास यशस्वीपणे पोलीसांनी ताब्यात घेवुन अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास मपोउपनि/रेखा पाटील हया करीत आहोत. सदर आरोपीत व त्याचे चालकावर नायगांव पोलीस ठाणे येथे मपोउपनि/रेखा पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि.नं. ३६०/२०२३ भादवि कलम ३०७,३५३,३३२,१०९,५०६,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

**<u>आरोपीत हा सराईत असुन त्यांचे विरोधात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.</u>**

(१) तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १४३/२०१६ भादवि कलम ३९७,३४ प्रमाणे

(२) तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ८१/२०१९ भादवि कलम ४२०, ४०६ एम.पी.आय.डी कलम ३,४ सह मोफा कायदा कलम ३,४,८,१३ प्रमाणे

(३) तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ५६८/२०२३ भादवि कलम ४२०,४०९,४६७,४६८,४७१,३४ प्रमाणे

(४) आचोळे पोलीस ठाणेत गुन्हा रजि नं ४९९/२०२३ भादवि कलम ४२०,४६५, ४६७,४६८,४७१

(५) आचोळे पो.स्टे. गुन्हा रजि नं ५११/२०२२ भादवि कलम ४२०,५०४,५०६,३४ प्रमाणे

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. विनायक नरळे, सहा.पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, श्री. बाळासाहेब रा.पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, पोनि/विवेक सोनवणे,(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि/ रेखा पाटील, व पोकॉ/ शिवराम शिंदे मसबु कर्मचारी/आव्हाड, मसुब/खवले यांनी केली आहे.